महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

# पक्षीमित्र

■ वर्ष पहिले ■ अंक ३ रा ■ संपादक : श्री. दिगंबर गाडगीळ ■ १ जुलै २०११

## संपादकीय...

### बदलावा का महाराष्ट्राचा राज्यपक्षी ?

महाराष्ट्राचा राज्यपक्षी पिवळ्या पायाचा हरताळ (Treron phoenicoptera) आहे हे पक्षीमित्रांना माहीत आहे. त्याऐवजी हा मान वनपिंगळ्याकडे (Athene blevitti) जावा अशी मागणी काही पक्षीमित्रांनी केल्यावरून वृत्तपत्रातून उलटसुलट मते प्रकाशित होऊ लागली आहेत. राज्यपक्षी ठरविण्याचे अथवा बदलण्याचे अधिकार राज्याच्या वन्य जीव मंडळाकडे आहेत. सर्वत्र आढळणारा हरताळ आणि सातपुड्याच्या सिमित भागात सापडणारा वनपिंगळा असा हा बदल होऊ शकतो. वनपिंगळा दीर्घकाळ दिसत नव्हता. त्यामुळे तो नामशेष झाला अशी शंका होती. पण तो ११३ वर्षांनी पुन्हा सापडला. काही ठिकाणी त्याची प्रकाशचित्रे घेतली गेली; ती प्रसिध्द झाली. आवाजही नोंदविले गेले. पक्षीतज्ज्ञांची अवस्था 'हरवले ते गवसले ना ।' अशी झाली. तो दुर्मिळ असल्याने त्याला मान मिळावा असा एक पक्ष, तर तसे केल्याने त्याचे संरक्षण होईल का ? तेव्हा सर्वत्र दिसणाऱ्या हरताळचा मान हिरावून घेऊ नये असा दुसरा पक्ष.

तसे पाहिले तर पांढऱ्या पोटाचा खंड्या (Haleyon smyrnensis) सर्वत्र दिसतो, परिचित आहे, सुरेख दिसतो म्हणून महाराष्ट्र पक्षीमित्राने त्याला आपल्या बोधचिन्हात स्थान दिले आहे व एका अधिवेशनात त्याला राज्यपक्षीपद द्यावे अशी मागणी केली होती. ही सूचना किती चांगली होती नाही ?

एव्हीतेव्ही या विषयावर चर्चा सुरु झाली आहेच. तेव्हा आपली मते व्यक्त होऊ द्या. वन्य जीव मंडळाने फेरविचार करण्याची शक्यता असताना ही मते समोर येऊ द्या, मोठ्या संख्येने.

(ता. क. : सदर लेख १ जून रोजी लिहिला गेला होता.

**दिगंबर गाडगीळ**
३९, आनंदवन कॉलनी, कॉलेज रोड, नाशिक – ४२२ ००५
फोन : (०२५३) २५७७९६८, मोबा. ९८८१०७९७११
E-mail : dkgadgil@indiatimes.com
dgadgil09@gmail.com

## अध्यक्षीय...

महाराष्ट्र पक्षीमित्र संस्थेचे कार्य आता हळूहळू वाढू लागले आहे. सभासद संख्या वाढते आहे. पक्षीमित्रचे दोन अंक प्रकाशित झाले आहेत. आता आपले कार्यक्रम गावागावात, शहरात एकत्रितपणे व्हायला पाहिजेत म्हणजे संस्थेच्या कामाला वेग येईल. ज्या गावात दहा पेक्षा जास्त सभासद आहेत तेथे महाराष्ट पक्षीमित्रचे केंद्र चालू करता येईल. संस्थेच्या माध्यमातून कार्यक्रम घेतल्यास सर्वांच्या सहकार्याने ते अधिक चांगले व व्यापक होतील. त्याचे अहवाल मुख्य कार्यालयाला पाठवावेत. त्याला पक्षीमित्र, वेबसाईट येथे प्रसिध्दी देता येईल. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा घेणे, पक्षी निरीक्षण सहली घेणे. तसेच काही काळानंतर मान्यवर पक्षीनिरीक्षकांबरोबर चर्चा, निरीक्षण असेही करता येईल. आपले मान्यवर पक्षीमित्र त्यासाठी जवळच्या ठिकाणी अवश्य उपस्थित राहतील.

दर वर्षी एकतरी मित्राला सभासद करून घेण्याचा प्रयत्न प्रत्येकाने ठेवावा. पक्षीमित्रसाठी प्रत्येकाने लिखाण करण्याचा प्रयत्न करावा. अगदी नवोदित पक्षीमित्रांनी केलेले लिखाणसुध्दा प्रसिध्द केले जाईल. चला तर लिखाणाला सुरुवात करूया...

**भाऊ काटदरे**
मोबा. : ९४२३८३१७०० E-mail : snmcpn@rediffmail.com
pakshimitra@gmail.com

**वार्षिक देणगी मुल्य रु. १००/–**
**''सभासद व्हा'' या चौकटीत दिल्याप्रमाणे पैसे पाठवा.**
**टीप : हा अंक आपल्या मित्रांपर्यंत पोचवा !**

# असा हा पक्षी मित्र

हा असा माणूस जगात विरळाच. ह्याचं नाव मारुती कुदळे. कुदळेंचा जन्म १९५० सालचा. राहतात पुण्यातील हनुमान टेकडीच्या अगदी पायथ्याशी. कांचन गल्लीत त्यांचे घर अगदी शेवटचे आणि टेकडीचा उंचवटा त्यांच्या घरातूनच जाऊन पुढे टेकडीत रूपांतर करतो. घर छोटेखानी आणि सुंदर छोटा बगिचा आणि एक मंदिर ह्यांनी नटले आहे. त्यांचे घर पाहून अगदी रॉबीन्सन क्रुसोच्या घराची आठवण येते.

छोटे बैठे घर एक मजलीच आणि त्यावर एक मोठी गच्ची. केवळ पाखरांसाठीच केली असावी. रोज सकाळी साधारण शंभर एक पारव्यांचा थवा बसलेला असतो गच्चीवर. त्यांना भरपूर दाणापाण्याची सोय असते. त्यांच्या घराच्या जवळील पाऊलवाटेने जाणाऱ्याने चुकून मोठ्याने आरडाओरडा केला तर भरऽऽरऽऽरऽऽर असा पंखांच्या फडफडण्याचा मोठा भरीव आवाज होऊन एक पारव्यांचा प्रचंड थवा त्यांच्या बागेवरून जाळीदार सावल्या हलवत उडून जातो; आणि तेव्हा जाणीव होते की एवढ्या संख्येने हे खगगण इथे शांतपणे बसले होते. ह्या पारव्यांच्या आधी काळे चकचकीत मोठे कावळे आणि साळुंक्यांचा थवा आपली क्रमवारी लावून गेलेला असतो. आणि नंतर दुपारभर आणि सूर्यास्तापर्यंत ह्या गच्चीवर पारव्यांचेच राज्य.



मारुती कुदळे हे 'सिंबीयोसीस' ह्या संस्थेत तिच्या स्थापनेपासून काम करीत होते आणि अगदी साधारण वर्षापूर्वीच निवृत्त झाले असावेत.

ते १९७० सालापासून सूर्योदयाच्या सुमारास नियमित हनुमान टेकडी चढतात आणि टेकडी वरील हनुमानाच्या देवळाची साफसफाई करतात. मूर्तीला स्नान घालतात आणि परिसर स्वच्छ करतात. हे चालू असताना सुचतील ती देवाची गाणी म्हणतात.

नियमित टेकडी चढल्यामुळे मंदिरसफाईचे सत्कार्य करताना त्यांना आसपास वावरणाऱ्या आणि पिंपळ वृक्षावर बसलेल्या विविध पक्ष्यांची संगत मिळाली. त्यांच्या हालचाली आणि मोहक आवाज त्यांच्या मनाला भुरळ पाडू लागले. त्यातून ह्या विविध जातींचा स्वभाव विशेषता त्यांना जाणवू लागली. तसेच ऋतू बदलामुळे पक्ष्यांवर होणारे परिणाम ही त्यांना समजू लागले. तेच तेच पक्षी नियमाने तेथे येतात आणि आपल्याला रामराम करतात व आपला नमस्कार स्वीकारतात असं त्यांना खात्रीनं कळू लागलं. त्या पक्ष्यांची पावसाळ्यातील आनंदी वृत्ती आणि उन्हाळ्यात होणारी त्रेधातिरपीट त्यांना समजली. उन्हाळ्यात पाण्यासाठी होणाऱ्या त्यांच्या उघड्या चोची त्यांना पाहवेनात. आणि त्यांनी ठरविले की आपण ह्यांची नियमित सेवा करायची ! त्यांनी ताबडतोब टेकडीवरील काही झुडूपांमध्ये व छोट्या वृक्षांवर मातीची छोटी मडकी बांधली आणि रोज सकाळी दोन मोठे ड्रम घेऊन त्यात पाणी भरून टेकडीवर चढून ती मडकी भरायला सुरुवात केली. शिवाय मधल्या पाऊलवाटांवर विविध प्रकारच्या धान्यांचे कोरडे दाणे विखरून ठेवायला सुरुवात केली. हे कार्य ते १९७० ते १९८० च्या दरम्यान दर शनिवारी करीत असत. कारण रोज एवढा वेळ त्यांना देता येत नसे. परंतु १९८० सालापासून आजतागायत श्री. कुदळे ह्या पक्ष्यांना रोज नियमित चारा पाणी घालतात. आणि आता तर पक्षी चांगलेच सोकावले आहेत. ते त्यांच्या आगमनाची वाट पाहतात आणि आश्चर्य म्हणजे जर टेकडी चढायला त्यांना उशीर झाला तर पायथ्याशी येऊन त्यांच्या घराभोवतालच्या झाडीत बसून कलकलाट करतात ! ह्या कलकलाटात कोकिळा आणि बुलबुल यांचा विशेष भाग असतो. मग कुदळेसाहेब पाण्याचे ड्रम आणि धान्याची पिशवी घेऊन घराबाहेर पडले की फांद्या फांद्यांतून कलकलाट करत त्यांना समांतर त्यांच्या बरोबरीने टेकडीवर येतात. आपल्याला कधी चारापाणी मिळते ह्याची घाई होते त्यांना. हे दृष्य शक्यतो उन्हाळ्यात बघायला मिळते आणि मोठी मौज वाटते.

नियमित चारापाणी घेण्यासाठी येणारे पक्षी म्हणजे १५ ते २० होले, सातभाईंचे अनेक थवे, बुलबुल, ग्रेट टिट, कावळे, रॉबीन, साध्या चिमण्या, भारद्वाज, कोतवालाची जोडी, चष्मेवाले आणि सर्वात आश्चर्य म्हणजे एक तित्तराची जोडी डुलतडुलत येते आणि पटापटा दाणे टिपून आपला कार्यभाग आटोपून निघून जाते. क्वचित एखादा हळद्या येतो आणि आपली बासरी वाजवतो आणि पिवळाशार सूट घालून आपले वेगळेपण दाखवतो. तो पाण्यावर येतो पण जमिनीवर काही उतरत नाही. हिवाळ्याच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत एक शामाचे जोडपे पाण्यासाठी येते पण नंतर काही दिसत नाही.

ह्या सर्व पक्ष्यांच्या साथीला गुबगुबीत शेपटाच्या छोट्या छोट्या रामाच्या खारी दाणे आणि पाण्यावर येतात. पिक् पिक् आवाज करीत मोठा दाणा मिळविण्यासाठी सैरावैरा धावतात. मधूनच बहुतेक त्या भांडतातही.

कधी कधी दूरवर ठेवलेल्या भांड्यांवर मोर पण येतात आणि जमिनीवर ठेवलेल्या दगडी भांड्यावर ससे येत असावेत रात्रीच्या वेळी. कारण दिवसा त्यांच्या लेंड्या दिसतात.

कित्येक वेळा कुदळेंना धामणीचे दर्शन झाले आहे आणि कधीतरी नागपण दिसतो.

ह्या सर्व पक्षी आणि प्राण्यांना कुदळेंची एवढी सवय झाली आहे की त्यांना एकमेकांना भेटल्याशिवाय राहवतच नाही. आणि हा स्नेह तर दिवसेंदिवस वाढतच आहे. आणि मग त्यासाठी त्या वेळी असलेल्या एखाद्या समारंभाचे आमंत्रण पण ते स्वीकारत नाहीत.

कोणत्या पक्ष्याचे केव्हा आगमन होणार, कोण येऊन गेला, कोण येणार आहे हे ते सर्व खात्रीने सांगतात आणि ते तसंच घडत असतं. कोण भांडकुदळ आहे, कोण शांत आहे, कोण किती खातो-पितो हे त्यांच्याकडून ऐकण्यात खूप मजा आहे. अगदी आपल्या विद्यार्थ्यांवर प्रेम करणारा शिक्षक जसे आपल्या विविध शिष्यगणांचे गुणदोषांसह वर्णन करतो, तसेच त्यांच्याकडून पक्षीगणांची माहिती ऐकण्याचा आनंद वेगळाच आहे.

श्री. कुदळे अशी ह्या रानपाखरांची गेली ४० वर्षे सेवा करीत आहेत. आणि अजून खूप मैत्री व्हायची आहे कारण पक्ष्यांची संख्या वाढतेच आहे.

त्यांच्या कामाचे कौतुक केले तर ते म्हणतात, ''माझी मागच्या जन्मीची फार मोठी पुण्याई असेल म्हणून देव माझ्याकडून हे काम करुन घेत आहे.

**– राजेंद्र चंद्रशेखर प्रधान**
मोबा. ९८९०८२९८०६ फोन ०२०-२५४३७४४४
E-mail : rajutatya41@yahoo.com

## ग्रंथ परिचय

### देशी वृक्ष

**लेखक :** प्रा. श्री. द. महाजन

मध्यंतरी एप्रिल २०११ मध्ये नाशिक परिसरातील वृक्षांच्या संदर्भात एक 'वृक्ष स्पर्धा' आबालवृध्दांसाठी मी व नेचर क्लबचे प्रा. बोरा यांनी आयोजित केली होती. त्या वेळी समारंभाच्या बक्षिस वितरणास प्रा. श्री. द. महाजन यांना आमंत्रित केले होते. तेव्हा त्यांच्या वरील ग्रंथाचा परिचय झाला. श्री. महाजन हे तर निसर्गाशी अतूट नाते असलेले व्यक्तिमत्व ! कोल्हापूर विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागात ३० वर्षे सेवा करून सेवानिवृत्त आयुष्य पुणे येथे व्यतीत करीत आहेत. आता त्यांच्या 'देशी वृक्ष' या ग्रंथाच्या परिचयाकडे वळूया.

**ग्रंथाचे अंतरंग**

ग्रंथाच्या प्रारंभी श्री. अनिल अवचट यांची प्रस्तावना आहे. प्रस्तावनेत ते वराह पुराणातील 'यावत् भूमंडलम् धत्ते' या श्लोकाचा संदर्भ देऊन त्याचा भावार्थ : 'या भूतलावरील पर्वत, वने, सरोवरे आहे तो पर्यंतच आपण, आपली नातवंडे, पुढील पिढ्या सुखात राहतील' हे सांगून भविष्याचा वेध घेतलेला आहे. जंगलाचे महत्व आपल्या पूर्वसूरींनी ओळखून त्याला अग्रस्थानी ठेवून त्याची जपणूक केली होती हे आपण विसरलो आहोत हा इशारा पण देतात. देशाच्या भूभागापैकी ३३% क्षेत्र जंगलाने आच्छादित असायला हवे. पण आपल्या देशात जेमतेम १२% एवढेच जंगल व्याप्त क्षेत्र आहे, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. कारण नैसर्गिक जंगल हा हजारो वर्षांच्या उत्क्रांतीचा परिपाक असतो.

यानंतर वनस्पती वर्गीकरण शास्त्र ज्याला 'टॅक्सॉनॉमी' म्हणतात त्यावर माहिती चार पानात दिली आहे. तसेच वनस्पतींचे नामकरण परिचय करून देताना कॅरोलस लिनियस या स्विडीश वनस्पती शास्त्रज्ञाच्या (इ. स. १७०७ ते १७७८) योगाचे महत्व सांगताना त्याचा 'वनस्पतीशास्त्राचा पितामह' या शब्दात गौरव करायला विसरत नाहीत. पुढच्या चार पृष्ठात ग्रंथातील सर्व वृक्षांची मराठी, वनस्पतीशास्त्रीय नावे पृष्ठ क्रमांक सूचीसह दिली आहेत. पुढच्या पृष्ठावर भारताच्या रंगीत नकाशात जैवभौगोलिक विभाग दर्शविले आहेत व वृक्षांच्या फुलण्याच्या काळाचा परिचय दिला आहे.

**वृक्ष परिचय :** पृष्ठ २३ पासून लेखकाने वृक्ष परिचयास प्रारंभ करताना अजान वृक्षापासून सुरुवात केली आहे. हा तर संत श्री ज्ञानेश्वर यांच्या समाधीस्थानी असलेला पूजनीय वृक्ष. तो अन्यत्र कुठे पहायला मिळतो हे पण सांगून त्याचा उत्कृष्ट फोटो डोळ्यात भरतो. यानंतर क्रमाने आईन, आपटा, आवळा ते थेट हिरड्यापर्यंत ६१ देशी वृक्षांचा परिचय सचित्र करून दिला आहे. प्रत्येक वृक्षप्रेमीने हा ग्रंथ वाचून आपल्या संग्रही जरुर ठेवावा असे आग्रहाने सांगतो.

**ग्रंथ शीर्षक :** देशी वृक्ष **पृष्ठ संख्या :** २४७

**ग्रंथ मूल्य :** ४००/- रुपये.

**- भा. ग. शेरे**

मोबा. ८७६३७०२९९०

## महाराष्ट्रातील निसर्गसंस्था

आपले पक्षीमित्र स्थानिक निसर्गसंस्थेत कार्य करीत असतील; निदान सहानुभूतीदार असतीलच. त्यांनी आपल्या निसर्गसंस्थेचा परिचय 'पक्षीमित्र'च्या माध्यमातून करुन द्यावा असे आवाहन करीत आहोत.

परिचयात स्थापना, पदाधिकारी, संपर्क पत्ता, फोन व पर्यावरण क्षेत्रात केलेली विशेष कामगिरी, पुढील संकल्प यांचा समावेश असावा.

या निसर्गसंस्थातील अधिकाधिक व्यक्ती महाराष्ट्र पक्षीमित्रचे सभासद होतील, त्यांच्या उपक्रमात सहभागी होतील यासाठी प्रयत्न करावा ही विनंती.

## त्यांचा प्रवास ३०६७ किलोमीटरचा !

गीज आणि हंस पक्षी सापडल्यास त्यांच्या गळ्याभोवती कॉलर अडकवून त्यांना मुक्त केले जाते. ते स्थलांतर करून गेल्यावर पक्षीनिरीक्षकांना ते सहजी ओळखता येतात. त्यावरुन त्यांचा प्रवास कळू शकतो.

२२ जानेवारी २०११ रोजी प. बंगालमधील बिरभूम जिल्ह्यातील बकरेश्वर बंधाऱ्यावर श्री. गोपा हलदर आणि श्री. कौशिक देऊत्ती या पक्षी निरीक्षकांना कॉलर असलेले तीन पट्टकादंब (Bar-headed Geese-*Anser indicus*) दिसले. अधिक चौकशी करता ते पक्षी मंगोलियातील वाईल्ड लाईफ कॉंझरवेशन सोसायटीने कॉलर अडकवून सोडून दिले होते. त्यानंतर त्यांचा ठावठिकाणा प. बंगालमध्ये पहिल्याने सापडला होता. त्यापैकी V2 कॉलरचा नर तर V7 कॉलरची मादी होती. त्यांना १४ जुलै २००९ रोजी मंगोलियातील शारगा तलावात सोडले होते. त्यांना पकडले तेव्हा बच्चे जन्माला घातल्यावर त्यांची पिसे झडण्याच्या काळात जेव्हा ते उडू शकत नाहीत, अशा अवस्थेत होते. तिथपासूनचे अंतर ३०६७ किलोमीटर होते. (Hornbill वरून)

## स. न. वि. वि.

पक्षीमित्रचा अंक आणि सभासदत्वाचा अर्ज मिळाला. मी सभासद होत आहेच. माझ्या ५/७ मित्रांना अर्जाची झेरॉक्स प्रत दिली आहे. लेख पाठवतो.

**अशोक आफळे, कोल्हापूर**

पक्षीमित्र खूप आवडला. त्याच्या प्रती काढून मित्रांना वाटल्या. सभासदत्वाचा अर्ज सोबत आहे.

**जयंत बेंद्रे, पुणे**

# हळद्या

काळ्या डोक्याचा 'हळद्या' नावाप्रमाणेच पिवळाधम्मक रंगाचा, काळ्या डोक्याचा पक्षी कोकणात सर्वत्र आढळतो. हळद्याच्या एकूण ५ जातींमधील २ जाती आपल्या कोकणात आढळतात.

१. काळ्या डोक्याचा हळद्या – Black Headed Oriole (Oriolns xanthohomus)
२. सोनेरी हळद्या – (Golden oriole (Oriolus oriolus)

दोन्ही हळद्यांच्या शेपटात काळा रंग असला तरी काळं डोकं ही ओळखण्याची खूण आहे. सोनेरी हळद्यापेक्षा काळ्या डोक्याचा हळद्या आपल्याकडे जास्त आढळतो. तो इथला कायमचा रहिवाशी व वीण करणारा पक्षी आहे. तर सोनेरी हळद्या स्थलांतरित पक्षी आहे.

विणीच्या हंगामात म्हणजे मार्च ते जून मध्ये हा पक्षी मोठ्याने पोकागो – पोकागो असे ओरडताना आढळतो. त्याच्या व्यतिरिक्त विविध आवाजही हा पक्षी काढतो. बाकी महिने तो शांतच असतो.

हा पक्षी कीटक, किडे, नाकतोडे, अळ्या इ. खातो. मी आणि रोहन लोवलेकरने ह्या पक्ष्याच्या विणीवर जवळजवळ ४ वर्षे काम केले. त्याआधी ह्या पक्ष्यावरील प्रसिध्द झालेले शोधनिबंध वाचले. त्यानंतर ह्या पक्ष्यावर लक्ष केंद्रित केले.

आतापर्यंत पाच घरट्यांवर याचे निरीक्षण केले तेव्हा बऱ्याच गोष्टी प्रथमच पहावयास मिळाल्या, ज्यांच्या कुठेही नोंदी नाहीत.

पूर्वीच्या लिखाणामध्ये ह्यातील नरमादी दोघेही घरटे बांधणे, अंडी उबविणे असे लिहिले गेलेले आहे. परंतु आम्ही बघितलेल्या घरट्यांवर फक्त मादीच घरटे बांधणे व अंडी उबविणे ह्या क्रिया करताना आढळली. नर तिला सतत ओरडून ह्या क्रिया करण्यास प्रोत्साहन देत असतो. तो कायम तिच्या घरट्याच्या आसपास राहून लक्ष ठेवण्याचे महत्त्वाचे काम करतो. घरट्याकडे येणाऱ्या धोक्यांना परतवून लावतो. तो फक्त पिलांना भरवण्याचे काम करतो.

ह्या पक्ष्यांचा विणीचा हंगाम मार्च ते जून ह्या दरम्यान नर मादी दोघेही ओरडून एकमेकांना साद देताना दिसतात. नर मादी दोघेही घरट्याची जागा निश्चित करतात व झाडांच्या फांदीच्या शेवटी असलेल्या बेचक्यात मादी घरटे बांधायला सुरुवात करते. घरटे लोंबलेल्या अवस्थेत असते. त्यासाठी ती सुके गवत कोळीष्टके, सुक्या फांदीचे धागे वापरते. घरटे पूर्ण झाल्यानंतर मादी रोज १ प्रमाणे ३ ते ४ अंडी घालते. अंडी पूर्ण पांढऱ्या रंगाची असतात. त्यावर गुलाबी रंगाचे ठिपके दिसतात.

साधारण १६ दिवसात अंड्यातून गुलाबी रंगाची व त्यावर पिवळ्या रंगाची लव असलेली (त्यांना इंग्रजीत डाऊन फेदर्स म्हणतात) पिले बाहेर येतात.

नर मादी दोघेही पिलांना अळ्या, कीटक, किडे, बारीक अतिपक्व फळे खायला घालून मोठी करतात. ही पिले २०–२२ दिवसात उडण्यास सक्षम होतात.

काही घरट्यातून पिले पावसाला सुरुवात झाली की उडून जातात. त्या दरम्यान घरटे पावसाने ओले होते व पिलांच्या वाढत्या वजनाने फांदीवरुन सुटून खाली पडते. अशा खाली पडलेल्या ३ घरट्यांना आम्ही पुन्हा त्याच फांदीवर फडक्याच्या तुकड्याचा आधार देऊन वाचविण्यात यश मिळविले व पिले त्या घरट्यातून उडून गेलेली पाहिली. एक घरटे अगदी पडायलाच आले होते. त्याला सुध्दा विश्वास जोशी, संजय गोडबोले यांच्या मदतीने वाचविण्यात यश मिळाले.

घरटे बऱ्यापैकी खोलगट असल्यामुळे आतील भागाचे निरीक्षण करण्यासाठी मी एका काठीला आरसा बसवला व तो १८० अंशात वाकवला. तो आरसा काठीच्या मदतीने घरट्यापर्यंत न्यायचो व आरशामध्ये घरट्यामधील भाग व्यवस्थित दिसायचा. हे सर्व पक्षी घरट्याजवळ नसताना करायचो.

**– सचिन बाळकृष्ण पालकर**
चलभाष : ०९४२११३४४६५
E-mail : sachinbpalkar82@gmail.com

# जखमी पक्षी सापडल्यास

काही वेळा जखमी पक्षी सापडतात. कधी खाली पडलेले तर कधी झाडावर दोऱ्यात अडकलेले. बराच काळ ते अन्नपाण्याशिवाय असल्यास त्यांना ग्लुकोजचे पाणी पाजावे. जखम स्वच्छ, निर्जंतुक करून मलम लावावे. त्यांना अपघाताने धक्का (Shock) बसलेला असतो. त्यासाठी होमिओपॅथिक शॉक मिक्श्चर द्यावे. हे औषध म्हणजे आर्निका ३०, इग्नेशिया ३०, ओपियम ३० आणि पॅसिफ्लोरा ३० चे द्रवरूपातील समप्रमाण मिश्रण करुन ते कोऱ्या गोळ्यांवर टाकून अर्धा कप पाण्यात ४/६ गोळ्या विरघळवून ते पाणी कापसाच्या बोळ्याने त्यांच्या तोंडात घालावे. अनेक वेळा त्याचा चांगला अनुभव आला आहे.


**– दिगंबर गाडगीळ**

# स्वागत...

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. योगेश्वर शशिकांतराव बिडवई | पुणे | ९९४५५९२६११ | snbidwai@rediffmail.com |
| श्री. जयंत वसंत बेंद्रे | पुणे | ९८२२२०९५३० | jayantbendre@gmail.com |
| डॉ. वैशाली उपेंद्र सोमणी | ठाणे | ९८३३५६९३०६ | vaishali.somani@gmail.com |
| श्री. दत्तविलास अंबादास दळवी | नाशिक | ९४२२२६०३४३ | dattadlv@gmail.com |
| श्री. मनोज सुभाष कुलकर्णी | नाशिक | ९८५०१२२४०९ | manojsk23@rediffmail.com |
| श्री. सारंग नारायण कुलकर्णी | यवतमाळ | ९६७३४१८०४८ | gypsypkd@gmail.com |
| डॉ. रमझान सद्रुभाई विराणी | यवतमाळ | ९४२२१९२७४१ | ramzan_virani@yahoo.co.in |
| कु. सुजाता हरिभाऊ शेंडे | यवतमाळ | ९९६०९३८३२६ | -- |
| श्री. धर्मेंद्र पुरणाजी तेलगोटे | यवतमाळ | ९४०४१४१५६४ | dptelgote@gmail.com |
| श्री. लक्ष्मीशंकर रामसमुझ यादव | अकोला | ९६८९३००६६९ | yadav_laxmishankar@yahoo.co.in |
| डॉ. कुसुम एस. गोखले | ठाणे | ९९६७२००३३३ | gokhales29@hotmail.com |
| श्री. कृष्णाजी हणमंत बक्षी | नाशिक | ७५८८३०६४०४ | -- |
| श्री. गजानन वाघ | अमरावती | -- | -- |
| श्री. मिलिंद सावदेकर | वाशिम | -- | -- |
| श्री. अशोक गणेश आफळे | कोल्हापूर | ९८२२०५२८२० | -- |
| वैशाली खांडेकर | मुंबई | -- | vaishali.khandekar@gmail.com |
| रसीका जोशी | डोंबिवली | ९८१९४०६५६३ | rasika810@gmail.com |
| श्री. श्रीनिवास आर. | मुंबई | ९८३३९४५७२३ | sxsrinivas@yahoo.co.in |
| श्री. सी. एस्. मोडक | ठाणे | ९८२००७०८८९ | -- |
| श्री. एस्. जे. शेख | ठाणे | ९८७०००४७२१ | -- |
| श्री. राजेंद्र चंद्रशेखर प्रधान | पुणे | ९८९०८२९८०६ | rajutatya41@yahoo.com |

## पक्षी मित्रांना आवाहन

आपली पक्षी निरीक्षणे, पक्षी अभ्यास, प्रकल्प, पक्ष्यांचे प्रथम दर्शन, शास्त्रीय पेपर इत्यादी पाठवावे. पक्षीमित्रमध्ये प्रसिधद् केले जाईल. लिखाण हाती लिहून, टाईप करुन किंवा टाईप करुन ई-मेलने - pakshimitra@gmail.com वर अथवा पोस्टाने महाराष्ट्र पक्षीमित्र, ११, युनायटेड पार्क, मार्कंडी, चिपळूण या पत्यावर पाठवावे.




### महाराष्ट्र पक्षीमित्रचे आजच **सभासद व्हा !**

एकदाच रु. ५००/- भरा व आजीवन सभासदत्व मिळवा.
आपण सभासद असाल तर अजून एक सभासद बनवा.

### सभासद कसे व्हाल ?

१) डी.डी. / मनीऑर्डर, ''महाराष्ट्र पक्षीमित्र'' या नावे चिपळूण येथे देय असलेला असावा.

२) Core Bank System नेही पैसे पाठवू शकता.
बँकेचे नाव : बँक ऑफ महाराष्ट्र, चिपळूण शाखा.
खात्याचे नाव : महाराष्ट्र पक्षमित्र.
बँक खाते नं. : ६००३६८१२०१७
खात्यात पैसे भरुन त्वरीत मेलने कळवणे तसेच सभासदत्व अर्ज भरुन पोष्टाने पाठवणे अत्यावश्यक आहे.

प्रति,

प्रेषक :
महाराष्ट्र पक्षीमित्र
११, युनायटेड पार्क, मार्कंडी,
चिपळूण, जि. रत्नागिरी - ४१५ ६०५
फोन : (०२३५५) २५३०३०
E-mail : pakshimitra@gmail.com
website : www.pakshimitra.org

**पक्षीमित्र**
संपादक : **श्री. दिगंबर गाडगीळ**
(खाजगी वितरणासाठी)
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी
संपादक सहमत असलेच असे नाही.
मुद्रक : **एस्. व्ही. प्रेस - चिपळूण**
फोन : (०२३५५) २५२३३०